१२
२६ मार्च २००८
महाराष्ट्र टाइम्स, मुंबई

# बेनेट कोलमनचा एन्झेम्बलमध्ये हिस्सा

म. टा. व्यापार प्रतिनिधी

बेनेट कोलमन अँड कंपनी लि.ने एन्झेम्बल इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या कंपनीमधील काही हिस्सा खरेदी केला आहे. एन्झेम्बल ही इंटिरिअर इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातली देशातील आघाडीची कंपनी असून, मुंबई, पुणे, बंगलोर, चेन्नई व नवी दिल्ली कंपनीचे कार्यक्षेत्र आहे. रिलायन्स, युनिलिव्हर, फ्युचर ग्रुप, टाटा ग्रुप, भारती आदी कंपन्या एन्झेम्बलच्या ग्राहक असून, देशभरात कंपनीने १५० प्रकल्प यशस्वी केले आहेत.